# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ B25785

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : २९/५/१४

## परिपत्रक

**विषय : महामंडळाच्या भूखंड विकसित करण्याच्या नविन मुदतवाढ धोरणात 'ड' व 'ड+' प्रभागाकरिता अंशतः सुधारणा करणेबाबत..**

संदर्भ : १. परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/ए७१२२२, दिनांक ०६.०३.२०१३.

२. परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/ए१०८०९, दिनांक ०९.०१.२०१४.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. १८.१२.२०१२ रोजी झालेल्या ३४८ व्या बैठकीतील पारित ठराव क्रमांक ५१६७ नुसार भूखंड विकसित करण्यासाठी मुदतवाढ देण्याचे सुधारीत धोरण संदर्भिय परिपत्रक क्र. १ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार दिनांक ३१.०८.२०१३ पर्यंतची मुदतवाढीची जी प्रकरणे नियमाकूल करुन घेण्यात आली आहेत, परंतु ज्यांनी अद्याप इमारत पूर्णत्वाचा दाखला (BCC) प्राप्त करुन घेतलेला नाही, तसेच ज्या प्रकरणात दिनांक ३१.०८.२०१३ नंतर विकास कालावधी शिल्लक आहे व त्यांना पुढील मुदतवाढीची आवश्यकता आहे, त्याचबरोबर दि. ३१.०८.२०१३ नंतर वाटप करण्यात आलेल्या भूखंडधारकांस त्यांचा विहित विकास कालावधी संपल्यानंतर जर मुदतवाढीची आवश्यकता असेल तर अशा भूखंडधारकांना अनुक्रमे २५ टक्के व ४० टक्के अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम आकारुन केवळ दोन मुदतवाढी देण्याचे धोरण अंगिकारण्यात आले असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. तथापि, अशा प्रकारे २५ टक्के अतिरिक्त रक्कमेचा आर्थिक बोजा अविकसित भागातील उद्योजकांना परवडणारा नसल्याने त्यावर पुनर्विचार होणेसाठी विषय संचालक मंडळाच्या दिनांक ०७.०१.२०१४ रोजी झालेल्या ३५४ व्या बैठकीमध्ये मांडण्यात आला होता. सदरहू विषयावर चर्चा होऊन ठराव क्र. ५३२३ पारित करण्यात आला.

सदर ठरावानुसार, अविकसित विभागातील उद्योजकांना २५ टक्के व ४० टक्के अतिरिक्त रक्कमेचा आर्थिक भार जास्त असल्याने या विभागातील उद्योगांना चालना मिळावी या हेतूने महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. १८.१२.२०१२ रोजीच्या बैठकीतील पारित ठराव क्र. ५१६७ अन्वये, दि. ०६.०३.२०१३ रोजी निर्गमित केलेल्या संदर्भिय परिपत्रक क्रमांक १ मधील अटी व शर्तीस अधिन राहून केवळ **'ड' व 'ड+' प्रभागातील उद्योजकांना दोन मुदवाढीसाठी अनुक्रमे २५ टक्के व ४० टक्के ऐवजी दोन वर्षांच्या मुदतवाढीकरीता प्रत्येकी १० टक्के ना परतीची अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम** आकारण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

सदरचे धोरण **'ड' व 'ड+'** प्रभागातील प्रलंबित असणा-या सर्व मुदतवाढ प्रकरणांकरीता आणि यानंतर प्राप्त होणा-या मुदतवाढ प्रकरणांकरीता दोन मुदवाढीसाठी २५ टक्के व ४० टक्के ऐवजी दोन वर्षांच्या मुदतवाढीकरीता प्रत्येकी १० टक्के ना परतीची अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम आकारण्याचे धोरण ठरावाचे दिनांकापासून लागू करण्यात येत आहे. तथापि, ज्या प्रकरणी 'ड' व 'ड+' प्रभागात दिनांक ०६.०३.२०१३ च्या परिपत्रकानुसार २५ टक्के अतिरिक्त प्रिमियम आकारुन मुदतवाढ दिली असल्यास अशा प्रकरणाचा पुनर्विचार करण्यात येऊ नये.

वरील अंशतः बदला व्यतिरिक्त ठराव क्रमांक ५१६७ मध्ये आणि त्याअनुषंगाने निर्गमित केलेल्या संदर्भिय परिपत्रक क्र. १ मध्ये इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वरील निर्णयाच्या अनुषंगाने मुदतवाढ मंजूर करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेतः -

| | | | |
|---|---|---|---|
| पहिली मुदतवाढ | औद्योगिक क्षेत्रा प्रभाग<br>**अ, ब. क** | २५ टक्के ना-परतीची अतिरिक्त अधिमुल्यांची रक्कम भरण्याच्या अटीवर | अ) **<u>औद्योगिक भूखंडासाठी</u>**<br>१५००० चौ.मी. पर्यत प्रादेशिक अधिकारी<br>१५००१ ते ३०००० चौ.मी. पर्यत उप मुख्य कार्यकारी अधिकारी<br>३०००१ चौ.मी. च्या पुढे सह मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | **ड व ड+** | १० टक्के ना-परतीची अतिरिक्त अधिमुल्यांची रक्कम भरण्याच्या अटीवर | ब) **निवासी व व्यापारी भूखंडासाठी**<br>निवासी व व्यापारी भूखंडासाठी भूखंड वाटपाच्या अधिकारानुसार प्रादेशिक अधिकारी/उप मुख्य कार्यकारी अधिकारी/सह मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| दुसरी मुदतवाढ | औद्योगिक क्षेत्रा प्रभाग<br>**अ, ब. क** | ४० टक्के ना-परतीची अतिरिक्त अधिमुल्यांची रक्कम भरण्याच्या अटीवर | म. औ.वि.म. संचालक मंडळ |
| | **ड व ड+** | १० टक्के ना-परतीची अतिरिक्त अधिमुल्यांची रक्कम भरण्याच्या अटीवर | |

सदरहू परिपत्रक विधी विभागाचे सहमतीने आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(डॉ. पी. अन्बलगन)**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.

८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई